"प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००% केंद्र पुरस्कृत)" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत तसेच निधी वितरीत करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१७/प्र.क्र.२६०/अभियान-१,
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०१८

वाचा : १) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने विशेष प्रकल्प (Special Project) व केंद्रीय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) संदर्भात निर्गमित केलेल्या मागर्दशाक सूचना.

२) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक १५/०७/२०१५.

३) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २०/०५/२०१६.

४) केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाची अधिसूचना क्रमांक एच-२२०११/२/२०१४-एसडीई-१, दिनांक २८/०२/२०१७.

५) प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-१ महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्रमांक खं.वि./चा-१/कौशल्य विकास व उद्योजकता विभाग/युओआर-८८/२०१७-१८/७५०, दिनांक २२/११/२०१७.

६) कौशल्य विकास व उद्योजकता विभागाचा शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१७/प्र.क्र.२३७/अभियान-१, दिनांक २६/१२/२०१७.

७) उप संचालक, SNP Division/Wing II, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक बी-१२०१२/३७/२०१७-एसएनपी, दिनांक २५/०९/२०१७

## प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने “प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) ” ही योजना दुसऱ्या टप्प्यात (२०१६-२०२०) राबविण्यास मंजुरी दिली असून चार वर्षासाठी ( २०१६-१७ ते २०१९-२०) एकूण १ कोटी युवकांना प्रशिक्षण देण्याचे लक्ष निर्धारित करण्यात आले आहे. सदर योजनेमध्ये राज्य शासनाचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनामार्फत सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यांच्या विशेष प्रकल्प व केंद्रिय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांची राज्य शासनामार्फत अंमलबजावणी करावयाची आहे.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत (PMKVY) राज्याचे विशेष प्रकल्प या उपक्रमाखाली समाजातील असुरक्षित, वंचित आणि दुर्लक्षित घटकांना मुख्य प्रवाहात सामावून घेऊन देशाच्या अर्थव्यवस्थेत भर घालण्याच्या दृष्टीने अल्पमुदतीचे कौशल्ययुक्त प्रशिक्षण देण्यासाठी नाविन्यपूर्ण, सृजनशील आणि व्यावहारिक प्रकल्प तयार करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने निकष निश्चित करण्यात आले आहेत. या अनुषंगाने आर्थिकदृष्या स्वउपयुक्त उद्योजकतांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना व कृषी व कृषी क्षेत्रामध्ये कारकीर्द करू इच्छिणाऱ्या युवकांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्याबाबतचा तसेच मागास व इतर प्रवर्गातील महिलांचे वस्त्रोद्योग क्षेत्राशी संबंधित कौशल्य विकसनासाठी कार्यक्रम राबविण्याबाबतचा राज्याचा विशेष प्रकल्प केंद्र शासनाकडे मान्यतेस्तव व निधी पुर्ततेसाठी पाठविण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे बांधकाम, वाहतुक, Automobile इत्यादीं क्षेत्राशी संबंधित कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याबाबतचे राज्याचे विशेष प्रकल्प निधी पुर्ततेसाठी केंद्र शासनाकडे पाठविण्याचे प्रस्तावित आहे.

केंद्रिय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांतर्गत नवीन प्रशिक्षणाकरिता (Fresh training) ४,८९,१५२ उमेदवार एवढे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. नवीन प्रशिक्षणा करिता (Fresh training) निर्धारित केलेल्या ४,८९,१५२ लक्ष्यापैकी २५% अर्थात १,६७,१२७ इतक्या उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण देण्याबाबतचे लक्ष्य महाराष्ट्रासाठी निर्धारित करण्यात आले आहे. सदर उपक्रमांतर्गत १) सेक्टर स्किल कौन्सिल (SSC) ने निर्देशित जॉब रोलपैकी केंद्रिय स्तरावर राबविण्यात येणारे जॉब रोल संदर्भातील अभ्यासक्रम वगळून इतर अभ्यासक्रम, २) SSC ने निर्देशित १२२२ जॉब रोल व्यतिरिक्त राज्य स्तरावरील विशिष्ट मागणीच्या जॉब रोल संदर्भातील अभ्यासक्रम, ३) पारंपारिक व्यवसायाशी सबंधित जॉब रोल व अभ्यासक्रम, ४) सेक्टर स्किल कौन्सिल (SSC) ने निर्देशित जॉब रोलपैकी केंद्रिय स्तरावर राबविण्यात येणाऱ्या २२१ जॉब रोल संदर्भातील अभ्यासक्रम इत्यादीं अभ्यासक्रमांचे राज्य शासनास प्रशिक्षण देण्याबाबत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या ३ वर्षाच्या कालावधीमध्ये १६७१२७ उमेदवारांना विविध क्षेत्रामधील कौशल्याचे प्रशिक्षण देण्याकरीता रूपये २४५.०८ कोटी इतक्या निधीच्या पुर्ततेबाबतचा विस्तृत प्रस्ताव केंद्र शासनास मान्यतेस्तव पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने मान्यता दिलेली असून, प्रथम वर्षाकरीता प्रथम टप्प्यात रूपये १८,०१,३०,१४९/- (रूपये अठरा कोटी एक लाख, तीस हजार, एकशे ऐकोणपन्नास फक्त) इतका निधी केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या दिनांक २५/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनास वितरीत करण्यात आलेला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधी मध्ये जमा झाल्याबाबत वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखेने अभिप्राय दिले आहेत.

प्रधान मंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत राज्यांच्या विशेष प्रकल्प व केंद्रिय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांच्या अमलबजावणीकरीता केंद्राकडून १०० टक्के निधी प्राप्त होणार आहे. सदरच्या निधीच्या अनुषंगाने राज्याच्या अर्थसंकल्पात प्रतिबिंबीत तरतूद करणे तसेच सदर निधी खर्च करण्यासाठी " प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००% केंद्र पुरस्कृत योजना)" या योजनेकरीता मा. प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी) -१ महाराष्ट्र, मुंबई व वित्त विभागाच्या मान्यतेने स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले आहे. तसेच सन २०१७-१८ करीता केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीच्या अनुषंगाने सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात पुरक मागणीद्वारे मंजूर लेखाशिर्षाखाली रूपये २९५.१० कोटी इतक्या रकमेची प्रतिबिंबित तरतूद (Shadow Provision) करण्यात आलेली आहे.

उक्त परिच्छेदांमध्ये नमूद वस्तूस्थितीचे अनुषंगाने " प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००% केंद्र पुरस्कृत योजना)" या योजनेस प्रशासकीय मान्यता तसेच केंद्रिय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमासाठी केंद्र शासनाकडून प्रथम टप्प्यात वितरीत केलेला रूपये १८,०१,३०,१४९/- इतका निधी खर्चासाठी अर्थसकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्याची बाब शासनाचे विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

प्रधान मंत्री कौशल्य विकास योजनेंतर्गत राज्यांच्या विशेष प्रकल्पांसाठी (Special Project) व केंद्रिय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमांच्या अमलबजावणीकरीता केंद्राकडून Public Financial Management System (PFMS) या प्रणालीमार्फत निधी प्राप्त होणार असल्याने सदरच्या निधीस अनुरूप राज्याच्या अर्थसंकल्पात प्रतिबिंबीत तरतूद करून निधी खर्च करण्यासाठी " प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००% केंद्र पुरस्कृत योजना)" या कार्यक्रमावरील खर्चाच्या योजनेस या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी घोषित करण्यात आलेली नोडल एजन्सी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था योजनेमध्ये अंतर्भूत प्रकल्पांसाठी कार्यान्वयन यंत्रणा राहील.

३. योजनेंतर्गत उपक्रमांची केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळावेळी केलेल्या सुधारणेनुसार तसेच विहित केलेल्या कालावधीमध्ये अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील. उपक्रमांच्या

अंमलबजावणीकरीता कोणत्याही नव्याने पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येवू नये, उपलब्ध पायाभूत/प्रशिक्षण सुविधांचा विनियोग करून प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यात यावी.

४. राज्य शासनाने योजनेसाठी वितरीत केलेला निधी आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी कोषागारामधून आहरीत करून मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना खर्चासाठी उपलब्ध करून देण्यात यावा.

५. देश पातळीवर कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यासाठी केंद्र शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाने संदर्भाधीन अधिसूचनेद्वारे सामायिक मार्गदर्शन सूचना निर्गमित केलेल्या आहेत. कार्यान्वयन यंत्रणेने सामायिक मार्गदर्शन सूचनांमधील तरतूदींनुसार अथवा त्यामध्ये केंद्र शासनाने वेळोवेळी सुधारीत केलेल्या तरतुदींनुसार तसेच ज्या उपक्रम/प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झालेला आहे त्याच उपक्रम/प्रकल्पासाठी खर्च करणे बंधनकारक राहील तसेच खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास विहित कालमर्यादेत पाठविण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांची जबाबदारी राहील.

६. प्रस्तूत योजनेंकरीता उपलब्ध होणारा निधी मागणी क्रमांक झेडए-१, २२३० कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन सेवा, ००१ संचालन व प्रशासन, (०१) सेवायोजन संचालनालय, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(१२) प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना (१००% केंद्र पुरस्कृत योजना) २२३०A३०७ या लेखाशिर्षाखालील उपलब्ध अनुदानातून खर्च करण्यात यावा.

७. उप संचालक, SNP Division/Wing II, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक २५/०९/२०१७ रोजीच्या पत्रान्वये केंद्रिय पुरस्कृत राज्य व्यवस्थापित भाग (Centrally Sponsored State Managed Component) या उपक्रमासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी रूपये ८५,७७,६२,६१५/- (पंच्याऐंशी कोटी सत्त्याहत्तर लाख बासष्ट हजार सहाशे पंधरा फक्त) इतका निधी मंजूर करण्यात आलेल्या निधीपैकी Public Financial Management System (PFMS) द्वारे वितरीत करण्यात आलेला रूपये १८,०१,३०,१४९/- (अठरा कोटी एक लाख, तीस हजार एकशे एकोणपन्नास फक्त) इतका निधी उक्त लेखाशिर्षाखाली अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांना वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. वितरीत करण्यात येत असलेला निधी केंद्र शासनाच्या दिनांक २५/०९/२०१७ रोजीच्या पत्रामधील सूचनांनुसार कार्यान्वयन यंत्रणेने खर्च करावा.

८. प्रस्तूत शासन निर्णय नियोजन विभागाच्या कार्यासन क्रमांक १४७१ यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५६/१४७१, दिनांक १६/०२/२०१८, वित्त विभागाच्या अर्थोपाय शाखा यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ८९/अर्थोपाय, दिनांक ०६/०३/२०१८, वित्त विभागाच्या अर्थ-१८ शाखेचा अनौपचारीक क्रमांक १३९/अर्थ-१८, दिनांक १२/०३/२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०३२७१२१५०५५००३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Wasudev Gawande

Digitally signed by Gajanan Wasudev Gawande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=598b4111a7392ee0c9038cf4c426c1f9ef65d75e9ac67ec77c38a9c5895cc932, serialNumber=92cce2bddffe9d1b98d5b31109f5f81e224273580cfca2f478d921078212cf69, cn=Gajanan Wasudev Gawande
Date: 2018.03.27 13:45:38 +05'30'

**( गजानन वा. गावंडे )**
अवर सचिव, महाराष्ट्र राज्य

**प्रत,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व संबंधित मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व संबंधित मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई
६. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य
७. मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, मुंबई
१०.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई.
११.आयुक्त तथा नगर संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१२.सर्व विभागीय आयुक्त,
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.आयुक्त, सर्व महानगरपालिका,
१५.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६.मुख्याधिकारी, सर्व नगर परिषद/नगर पंचायती,
१७.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

१८. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

१९.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद, मुंबई.

२०.उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/ नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२१.सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.

२२.निवड नस्ती. (अभियान-१).